“ प्रेसनोट ” दिनांक-०३/११/२०१७.

# “ पेट्रोल पंप घोटाळयातील अटक व पाहीजे असलेल्या एकुण ४८ आरोपीतांचे जामीनअर्ज सत्र न्यायालयाने फेटाळले ”

मानपाडा पो.स्टे. गुन्हा रजि.नं. I ३५३/२०१७,भा.दं.वि.क.२६५,२६७,४२०, ४६५, ४६८, ४७१, ४७३, ३४ सह, दि मोटार स्पिरीट ॲन्ड हाय स्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय डिस्ट्रीब्युशन ॲन्ड प्रिव्हेन्शन ऑफ माल प्रॅक्टीसेस) ऑर्डर २००५चे क्लॉज ३,(६)चे उल्लंघन, सह अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३,७,८,९ प्रमाणे दिनांक-१७/०६/२०१७ रोजी दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा,घटक-१,ठाणे कडुन करण्यात येत आहे.

सदर गुन्हयामध्ये पेट्रोल पंपावरील डिझेल/पेट्रोल डिस्पेन्सिग युनिट मधील पल्सर कार्ड, मदर बोर्ड, कंट्रोलकार्ड, किपॅड या मध्ये फेरफार करुन ग्राहकांना कमी डिझेल/पेट्रोल वितरीत होईल अशा प्रकारचे प्रोग्रामिंग केलेले इंटिग्रेटेड सर्किट (IC) बसविले असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्हयात अदयाप पावेतो महाराष्ट्र राज्यातील १) ठाणे, २) मुंबई, ३) रायगड, ४) रत्नागिरी, ५) नाशिक, ६) पुणे, ७) सातारा, ८) धुळे, ९) जळगांव, १०) औरंगाबाद, ११) नागपुर, १२) चंद्रपुर, १३) यवतमाळ, १४) अमरावती, १५) कोल्हापुर, १६) सांगली,१७) पालघर, १८) अहमदनगर ,१९) सोलापूर, २०) उस्मानाबाद,२१) लातूर अशा २१ जिल्हयांतील व ओरीसा राज्यातील २ असे १) इंडीयन ऑईल (IOCL), २) हिंदूस्थान पेट्रोलीयम (HPCL), ३) भारत पेट्रोलीयम (BPCL) , आणि ४) एस्सार पेट्रोलीयम (ESSAR),अशा एकुण **१८८** पेट्रोल पंपावर तपासणी करुन सदोष असलेल्या **९८** पेट्रोलपंपावर कारवाई करण्यात आली आहे. त्यामध्ये पेट्रोलपंप मालक/चालक-०६, मॅनेजर - ०८, तंत्रज्ञ (टेक्नीशियन) खाजगी -०९, अधिकृत -०९ , माजी सॉफ्टवेअर इंजिनियर - ०१ असे एकुण ३३ आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे.

सदर गुन्हयातील अटक आरोपीतांपैकी आरोपी नामे **विपुल शांतीलाल देढीया व इतर ११ आरोपी तसेच पाहीजे असलेले आरोपी विनय श्रीधर पाटील व इतर ३५ असे एकुण ४८ आरोपीतांनी** मा. जिल्हा व सत्र न्यायालय कल्याण या न्यायालयात जामीनासाठी व अटकपुर्व जामीनाकरीता अर्ज केले होते.सदर अर्जाची मा.न्यायाधीश श्री.एन.एम. वाघमारे , डिस्ट्रीक्ट जज-२ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश कल्याण या न्यायालयात आज दि.०३/११/२०१७ रोजी अंतिम सुनावणी झाली. सदर वेळी आरोपी पक्षाकडुन व सरकारी पक्षाकडुन युक्तिवाद करण्यात आला. त्यावेळी सरकारी पक्षातर्फे सरकारी वकील सौ. रचना भोईर,श्री. सचिन कुलकर्णी व श्री योगेद्रं पाटील यांनी भक्कम बाजु मांडली असुन मा. न्यायालयाने दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकुन ४८ आरोपीतांचे जामीन अर्ज फेटाळलेले केलेले आहेत.

मा.पोलीस आयुक्त श्री.परम बीर सिंग, मा. पोलीस सह आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय, मा.अपर पोलीस आयुक्त श्री.मकरंद रानडे (गुन्हे), मा.पोलीस उप आयुक्त श्री. अभिषेक त्रिमुखे, (गुन्हे), मा. सहा. पोलीस आयुक्त(शोध)गुन्हे, श्री. मुकुंद हातोटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक रणवीर बयेस व पथक पुढील तपास करीत आहेत.